**विशेष दिवाणी दावा क्र. ०५/२०१९**
नभिराज / कार्यकारी अभियंता
निशाणी क्रमांक **३० सोबत**

**अर्ज नि.क्र. ४७ वरील आदेशान्वये वादीचा साक्षीदार बालाजी वामनराव बिराजदार यांचा शपथेवर पुढील सरतपास सुरु**

सन २०१५ मध्ये मी तलाठी म्हणुन कसबे परंडा येथे कार्यरत होतो. मला साक्ष नोंदविणे करीता संचिका क्र. २०१५/महसुल/नै.आ./कावि/१०६ दि. २७.०३.२०१५ ची मुळ संचिका हजर करणेचे आदेश झालेले होते. त्याप्रमाणे मी दि. ३०.१०.२०२५ रोजी तहसील कार्यालय, परंडा यांचेकडे अर्ज देवून वर नमुद संचिकेची मागणी केली होती. अभिलेखपाल, तहसील कार्यालय, परंडा यांनी दि. १०.११.२०२५ रोजी मला कळविले की, मी मागणी केलेली संचिका त्यांचे अभिलेख कक्षात शोध घेतला असता आढळुन आली नाही आणि सदरची संचिका गहाळ झाली आहे. वर नमुद पत्र मी दाखल केले असुन ते **नि.क्र. ४८** वर आहे.

या प्रकरणातील वादीने तहसील कार्यालय, परंडा येथे अर्ज देवून कसबे परंडा येथील गट क्र. ८०/अ मधील त्याचे जमिनीस भेट देवून घटनेत जळालेल्या पिकाचा पंचनामा करण्याची विनंती केली. वादीच्या अर्जाप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. वादीच्या जमिनीत मला मोसंबीचे पिक दिसुन आले, ते पिक पाण्याअभावी सुकल्याचे दिसुन आले. गट क्र. ८२ मध्ये एक विहीर आणि गट क्र. ८३ मध्ये विद्युत डी.पी. मला दिसुन आले. मला गट क्र. ८२ मधील विहीरीत पाणी दिसुन आले. घटनास्थळी हजर असलेल्यापंचनाकडून मला माहिती मिळाली की गट नंबर ८३

मधील डी. पी. जळाल्यामुळे तिथे आग लागलेली होती. पुढे मला पंचनाकडून असे समजले की, डी. पी. जळाल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाला होता त्यामुळे मोसंबीच्या बागेला पाणी न दिल्यामुळे बाग सुकलेली होती. घटनास्थळच्या शेजारचे साधारणतः पाच ते सहा पंच हजर होते. आता मला पंचनाम्याची प्रत दाखवण्यात आली. सदरचा पंचनामा दिनांक २७.०३.२०१५ रोजीचा आहे. पंचनाम्यातील मजकुर मी स्वतः लिहिलेला होता. पंचनाम्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. वादीच्या जमिनीत जी परिस्थिती मला दिसून आली होती त्याप्रमाणे पंचनामा तयार करण्यात आलेला होता, तो बरोबर आहे. मी पंचनामा तयार केल्यांनतर तहसील कार्यालयात अहवालासोबत सादर केलेला होता. आता मला तो अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तो अहवाल **निशाणी क्रमांक ४९** वर आहे. आता मला पंचनाम्याची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. सदरची प्रमाणित प्रत तहसील कार्यालयाकडून देण्यात आलेली आहे. सदर पंचनाम्याची मुळ प्रत गहाळ झालेली आहे. म्हणून मी मुळ प्रत सोबत आणू शकत नाही. (प्रतिवादीच्या विधीज्ञांने पंचनाम्याच्या प्रमाणित प्रतीस निशाणी क्रमांक देण्यास हरकत नोंदविली आहे. साक्षीदाराच्या साक्षीवरुन असे स्पष्ट झाले आहे की पंचनामयाची मुळ प्रत गहाळ झाली आहे. तसेच वादीस दुय्यम पुरावा सादर करण्याबाबत आदेशीत झालेले आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार केला असता पंचनाम्यास निशाणी क्रमांक देणे ऊचीत होणार आहे.) पंचनाम्याच्या प्रमाणित प्रतीस **निशाणी क्रमांक ५०** देण्यात येते.

**प्रतिवादीतर्फे उलटतपास विधीज्ञ एस.पी. भालेराव यांच्याकडून**

मी परंडा येथे तलाठी म्हणून निश्चीत कोणत्या कालावधीपर्यंत कार्यरत होतो, हे आज रोजी मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की मी सन २०१५ पर्यंत कार्यरत होतो.

मी सन २०१५ मध्ये परंडयाचा गावकामगार तलाठी म्हणून कार्यरत असल्याबाबतचा पत्र सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की वादी हा माझा चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की मी वादीला ओळखतो कारण तो खातेदार आहे. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यासाठी वादीने माझ्याकडे अर्ज दिलेला नव्हता. वादीने दिलेल्या अर्जाची प्रत आज रोजी माझ्यासोबत नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की वादीने पंचनामा करण्यासाठी अर्ज तहसील कार्यालयात दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की मी तहसील कार्यालयात दिलेल्या अहवालासोबत वादीने दिलेल्या अर्जाची प्रत जोडलेली नव्हती. वादीने दिलेलया अर्जाची प्रत तहसील कार्यालयात आहे. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा करण्यासाठी मी वादीच्या जनीत प्रत्यक्षत गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मी तहसील कार्यालयात बसून पंचनामा तयार केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की वादीने मोसंबीचे पीक कधी लावले होते हे मला सांगता येणार नाही. मोसंबीची झाडे लावून किती वेळ झाला होता हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की पंचनाम्याच्या वेळी मोसंबीच्या झाडाला फुले लागलेली होती. तहसीलदाराने मला पंचनाम्यासाठी दिलेलया आदेशाची प्रत मी सोबत आणलेली नाही. तहसीलदाराने कोणत्या तारेखला आदेश केले होते हे आज रोजी मला सांगता येणार नाही. तहसीलदाराचे आदेश झाल्यानंतर मी किती दिवसांत पंचनामा केला होता हे आज रोजी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्याच्या वेळी गट क्रमांक ८०, ८२ व ८३ या जमिनीचे सातबारा उतारे पाहिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की गट क्रमांक ८२ च्या उताऱ्यात विहीरीची नोंद नव्हती. हे म्हणणे खरे नाही की गट क्रमांक ८० च्या साताबारा उताऱ्यात मोसंबी बागाची नोंद नव्हती. ८० आर जमिनीत मोसंबीचे किती झाडे लावता येतील हे आज रोजी माल सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही

की वादीच्या जमिनीत एकुण २२५ मोसंबीची व १अंब्याचे झाडे होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की  गट क्रमांक ८२ मध्ये असलेल्या पंचनाम्याच्या वेळी पाणी होते असा उल्लेख पंचनाम्यात नमुद नाही. वादीने तहसीलदाराकडे पंचनाम्यासाठी अर्ज दिल्यानंतर साधारणतः एक महिन्याच्या कालावधीनंतर पंचनामा करण्यात आला होता, ही बाब मला आज रोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी एक महिन्याच्या ऊशीराने पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या शेतातील मोसंबीचे झाडे सुकलेलया अवस्थेत दिसावे म्हणून मला वादीने एक महिन्यानंतर त्याच्या शेतात घेऊन गेला होता. हे म्हणणे खरे नाही की मी वादीशी संगणमत करुन खोटा पंचनामा तयार केलेला आहे.  हे म्हणणे खरे आहे की पत्र निशाणी क्रमांक ४९ वर तहसील कार्यालयाचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की मी वादीशी संगणमत करुन सदरचे खोटे पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीला नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी खोटा पंचनामा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.11.26 11:17:38 +0530

दिनांकः–२५.११.२०२५

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 25-11-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 25-11-2025 |
| Order uploaded on | - | 26-11-2025 |